# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १४२/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. सुमीर सबरवाल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नियुक्त अधिकारी-३ (एच/पश्चिम)**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम) मुंबई -४०० ०५२.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम) मुंबई -४०० ०५२.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १३.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. ३३४१/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १४२१/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १८.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उपलब्ध माहिती १५ दिवसामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क द्यावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १७.०२.२०२० रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा नियुक्त अधिकारी- ३ (एच/पश्चिम), बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त एच/ पश्चिम विभाग यांचे कार्यालय, बांद्रा (पश्चिम), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०४.०३.२०२० व दि. ३१.१२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा नियुक्त अधिकारी- ३ (एच/पश्चिम), बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त, एच/ पश्चिम विभाग यांचे कार्यालय, बांद्रा (पश्चिम), मुंबई यांनी दि. ०५.०१.२०२१ रोजी आयोगास अहवाल सादर केलेला आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी आयोगास सादर केलेला अहवाल दि. ०५.०१.२०२१ आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, राज्य माहिती आयोग यांचे आदेश दि. १८.१२.२०१९ रोजीच्या अनुषंगाने दि. १०.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना २९ पृष्ठांची माहिती पाठविण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्राची प्रत स्पीड पोस्टाने पाठविल्याची नोंद आयोगासमोर सादर केली.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

प्रदीप व्यास 14-10-2025

**मुंबई**
**दिनांक : १४.१०.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**